आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१६ ऑगस्ट २०२६ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- माजी प्रधानमंत्री भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या पुण्यतिथी निमित्त देशाची आदरांजली

- विकसित भारताचं स्वप्न साकारण्यासाठी युवा, गरीब, महिला आणि शेतकऱ्यांचं सक्षमीकरण गरजेचं असल्याचं केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन

- केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाची विदेशी मालमत्ता प्रकटीकरण योजना लागू

**आणि**

- श्रीलंकेविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात दुसऱ्या दिवसअखेर भारताच्या पहिल्या डावात ९ बाद ४६० धावा

**<><><><><>**

माजी प्रधानमंत्री भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या पुण्यतिथी निमित्त आज देशानं त्यांना आदरांजली वाहिली. नवी दिल्लीत सदैव अटल या त्यांच्या समाधीस्थळी आज सकाळी सर्वधर्मीय प्रार्थना सभा झाली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह सर्व प्रमुख नेत्यांनी अटलजींच्या समाधीवर पुष्पांजली अर्पण केली.

अटलजींनी आपल सर्व आयुष्य देशसेवेसाठी समर्पित केल. त्यांच्या सक्षम नेतृत्वानं आपल्या देशाला अधिक मजबूत बनवलं अशा शब्दांत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आदरांजली वाहिली आहे. राजस्थानात चितोडगढ इथं अटलबिहारी वाजपेयी यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं अनावरण केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं. अजातशत्रू म्हणून ओळखले जाणाऱ्या वाजपेयी यांनी दीर्घ काळ विरोधी पक्षात काम केलं, परंतु कधीही आपल्या तत्त्वांशी तडजोड केली नाही असं ते म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, तसंच ज्येष्ठ नेते शरद पवार यांनीही वाजपेयी यांना आदरांजली वाहिली आहे.

**<><><><>**

२०४७ पर्यंत विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी युवा, गरीब, महिला आणि शेतकऱ्यांचं सक्षमीकरण गरजेचं असल्याचं प्रतिपादन केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी केलं आहे. राजस्थानात अलवर इथं ते जाहीर सभेत बोलत होते. राजस्थानातल्या १७ जिल्ह्यांमधल्या ६ हजार ४५३ कोटी रुपये खर्चाच्या विविध  विकास प्रकल्पांचं लोकार्पण आणि पायाभरणी शहा यांच्या हस्ते झाली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातलं सरकार सत्तेवर आल्यापासून शेतकऱ्यांना किमान हमी भाव वारंवार वाढवून दिले आहेत असं सांगून सहकाराबद्दल ते म्हणाले.....

**होल्ड- बाईट- शहा**

ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कायापालट करण्यासाठी दुग्धव्यवसायात प्रचंड क्षमता असून दुग्धोत्पादन वाढवण्यासाठी चांगल्या प्रजातीच्या गायी म्हशी राजस्थानातल्या घराघरात उपलब्ध करून देण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे, असं ते म्हणाले. या कार्यक्रमात मुख्यमंत्री किसान सम्मान निधीचा हप्ता शेतकऱ्यांच्या बँक खात्यात शहा यांच्या हस्ते जमा करण्यात आला.

**<><><><>**

राज्यात उपलब्ध झालेल्या १ हजार ४४० डॉक्टरांची येत्या काही दिवसांत नियुक्ती केली जाणार आहे, अशी माहिती आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. त्यांनी आज सार्वजनिक आरोग्य विभागाच्या महिला आरोग्य समिती, जन आरोग्य समिती आणि रुग्णकल्याण समितीच्या सदस्यांशी ऑनलाइन पद्धतीनं ‘जन आरोग्य संवाद’ साधला. आणखी ६०० डॉक्टरांसाठी जाहिरात दिली जाणार

असून, सुमारे २५० दंतचिकित्सकही लवकरच आरोग्य सेवेसाठी उपलब्ध होतील, असंही त्यांनी यावेळी सांगितलं

आरोग्य व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाही आरोग्यमंत्र्यांनी दिली. आरोग्य समित्यांच्या माध्यमातून आतापर्यंत सहा लाखांहून अधिक नागरिकांशी संवाद साधला असून आणखी चार लाख नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या आरोग्यविषयक समस्या सोडवल्या जातील, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

एका सुगंधी वेलचीच्या जाहिरातीसाठी राज्याच्या अन्न आणि औषध प्रशासन विभागाने अभिनेता शाहरुख खान, अजय देवगण आणि टायगर श्रॉफ यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. या जाहिरातीच्या आडून बंदी असलेल्या पानमसाला आणि तंबाखुजन्य उत्पादनांचा अप्रत्यक्ष प्रचार होत असल्याचा दावा विभागानं केला आहे. संबंधित वेलची उत्पादन हे त्याच नावाचं साधर्म्य असलेल्या पानमसाल्याशी संबंधित असल्यानं ग्राहकांची दिशाभूल होऊ शकते, असं विभागानं म्हटलं आहे. या नोटिशीवर पुढच्या पंधरा दिवसांत उत्तर देण्याचे निर्देश विभागाने दिले आहेत.

**<><><><><>**

पदवीधर विद्यार्थ्यांनी राष्ट्र प्रथम या तत्त्वाचं पालन करून राष्ट्रनिर्मितीसाठी आपलं ज्ञान, कौशल्य आणि नाविन्यपूर्ण कल्पनांचा वापर करावा असं आवाहन उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी केलं. चेन्नई जवळच्या कट्टनकुलथूर इथे (SRM) एस आर एम या विज्ञान आणि तंत्रज्ञान संस्थेच्या बाविसाव्या दीक्षांत समारंभात ते आज बोलत होते. 'विकसित भारत' बनण्याच्या देशाच्या प्रवासात भारताच्या तरुणांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे, त्यामुळे त्यांनी अंमली

पदार्थांपासून दूर राहून शिस्त, ध्येयनिष्ठा आणि उत्कृष्टतेचा मार्ग निवडावा असंही ते यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळ-CBDT ने विदेशी मालमत्ता असलेल्या लहान करदात्यांसाठी 'विदेशी मालमत्ता प्रकटीकरण योजना नियम, २०२६' अधिसूचित केले आहेत. या योजनेअंतर्गत, पात्र करदाते विहित कर किंवा शुल्क भरून काही अघोषित विदेशी मालमत्ता किंवा विदेशी उत्पन्न घोषित करू शकतील. ही योजना आजपासून लागू झाली आहे. घोषणापत्र दाखल करण्याची अंतिम तारीख ३१ डिसेंबर आहे. त्या तारखेनंतर कोणतेही घोषणापत्र दाखल करण्याची आवश्यकता राहणार नाही. ही एक-वेळची ऐच्छिक प्रकटीकरण योजना आहे.

**<><><><><>**

भारतीय क्रिकेट संघाच्या श्रीलंका दौऱ्यात गॉल इथं सुरू असलेल्या पहिल्या कसोटी सामन्यात आज दुसऱ्या दिवसअखेर भारतानं पहिल्या डावात ९ बाद ४६० धावा केल्या.

कालच्या २ बाद २८८ धावांवरुन आज दुसऱ्या दिवसाचा खेळ सुरु झाल्यानंतर ऋषभ पंत ३९ धावांवर बाद झाला. काल जायबंदी झाल्यानं मैदान सोडावं लागलेला के एल राहुल पुन्हा फलंदाजीसाठी आला. मात्र कालच्या ७७ धावांमधे फक्त ५ धावांची भर घालून तो बाद झाला. देवदत्त पडिक्कलनं १६७ धावा केल्या. ध्रुव जुरेलनं ५१ धावांचं योगदान दिलं. आजचा खेळ थांबला तेव्हा प्रसिद्ध कृष्णा १, तर कुलदीप यादव १२ धावांवर खेळत होते.

**<><><><><>**

बांगलादेश क्रिकेट संघानं ऑस्ट्रेलियाविरुद्ध प्रथमच कसोटी सामन्यात विजय मिळवला आहे. ऑस्ट्रेलियात डार्विन इथं झालेल्या सामन्यात बांगलादेशानं ९ गडी राखून विजय मिळवला. बांगला देशानं पहिल्या डावात ४२६ धावा केल्या होत्या.

पहिल्या डावात केवळ १९८ धावा करणाऱ्या ऑस्ट्रेलियाचा दुसरा डावही आज मेहिदी हसन मिर्झाच्या भेदक गोलंदाजीमुळे २८४ धावांवर आटोपला. बांगला देशानं दुसऱ्या डावात एका गड्याच्या मोबदल्यात ५७ धावा करत सामना जिंकला.

**<><><><>**

बी डब्ल्यु एफ जागतिक बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेला उद्यापासून नवी दिल्लीत सुरुवात होत आहे. येत्या २३ ऑगस्टपर्यंत होणाऱ्या या स्पर्धेचं यजमानपद भारत दुसऱ्यांदा भूषवत आहे. या स्पर्धेत भारताकडून पी. व्ही. सिंधू, लक्ष्य सेन, आयुष शेट्टी, सात्विकसाईराज रांकीरेड्डी, चिराग शेट्टी, ट्रिसा जॉली, गायत्री गोपीचंद, ध्रुव कपिला, तनिषा क्रास्टो हे खेळाडू उतरणार आहेत.

**<><><><>**

जम्मू काश्मिर मध्ये जम्मू पुंछ राष्ट्रीय महामार्गावर सुंगल बोगद्याचं लोकार्पण झालं. २ पूर्णांक ७९ किलोमीटर लांबीच्या या बोगद्यामुळे प्रवासाचं अंतर १३ किलोमीटर नं कमी होईल. राजौरी आणि पुंछ या जिल्ह्यांना त्याचा फायदा होणार असून, स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर नियोजित वेळेआधीच तो खुला केल्यानं प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे.

**<><><><>**

रशिया आणि युक्रेन या दोन्ही देशांनी आज परस्परांच्या देशातल्या महत्वाच्या शहरांवर केलेल्या क्षेपणास्त्र आणि ड्रोन च्या हल्ल्यांमध्ये दोन्ही देशांचे मिळून किमान ११ नागरिक मरण पावले आहेत. युक्रेनच्या ड्रोनहल्ल्यामुळे मॉस्कोजवळची तीन शहरं आणि एक रेल्वे स्थानक उध्वस्त झाल्याचं मॉस्कोच्या महापौरांनी म्हटलं आहे. रशियाने युक्रेनच्या क्यिव शहराजवळच्या लष्करी सामुग्रीच्या कारखान्यांवर केलेल्या ड्रोनहल्ल्यांमध्ये ५ जण ठार आणि १४ जण जखमी झाल्याचं युक्रेनचे अध्यक्ष वोलोदीमीर झेलेन्स्की यांनी म्हटलं आहे.

**<><><><>**

लष्करप्रमुख जनरल धीरज शाह आजपासून नेपाळच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर गेले आहेत. भारत आणि नेपाळ या दोन्ही देशांचं संरक्षण सहकार्य आणि दोन्ही लष्करांमधल परस्पर सौहार्द वाढवणं हा या भेटीमागचा हेतू आहे.

**<><><><><>**

आग्नेय आशियातून आयात केलेली ‘अरेका नट्स’ ही सुपारी बांगलादेशातून आयात केल्याचं घोषित करून, ‘साफ्टा’, अर्थात ‘दक्षिण आशिया मुक्त व्यापार क्षेत्र’ करारा अंतर्गत मिळणाऱ्या सवलतीचा बेकायदेशीरपणे लाभ घेणाऱ्या एका मोठ्या टोळीचा डीआरआय, अर्थात महसूल गुप्तचर संचलनालयाने पर्दाफाश केला आहे. या फसवणुकीमुळे सुमारे अडीच हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त महसूल बुडाल्याचा अंदाज असल्याचं अर्थमंत्रालयानं म्हटलं आहे. या प्रकरणी ९ जणांना अटक करण्यात आली आहे.

**//<><><><><>//**